**योजना**

**जिल्हा नियोजन समिती अंतर्गत खालील प्रमुख योजना आहेत.**

**आमदार स्थानिक विकास कार्यक्रम**

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम विशेषत: स्थानिक गरजांवर आधारीत लहान लहान कामे घेण्याचा कार्यक्रम आहे. राज्यात सदर कार्यक्रम 1984 सालापासून राबविण्यात येत आहे. एक किंवा दोन कामाच्या मासमात पूर्ण होणारी लहान लहान कामे उदा. लहान रस्ते, मिसिंग लिंक्स, लहान पूल, प्राथमिक शाळांची बांधकामे, सामाजिक सभागृहे, ग्रंथालयांचे बांधकाम इ. 10 लाख रूपयांपर्यंत अंदाजित किंमतीची कामे या योजनेतून हाती घेतली जातात. प्रत्येक विधानसभा मतदार संघासाठी दर वर्षी एक कोटी रूपये निधी प्राप्त होतो. विधान परिषद सदस्य त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यात कामे सुचवू शकतात.

**खासदार स्थानिक विकास कार्यक्रम**

ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना असून सदर योजना 1993 सालापासून राबविण्यात येत आहे. एक किंवा दोन कामाच्या मोसमात पुर्ण होणारी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अनुज्ञेय असलेली कामे या योजनेतून हाती घेतली जातात. या योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या निधीपैकी वित्तीय वर्षाअखेर अर्खचित राहिलेला निधी व्यपगत न होता पुढील वर्षी खर्च करता येतो. ना नफा ना तोटा तत्वावर मागील तीन वर्षापासून कार्यरत असणा-या सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट 1860 अंतर्गत नोदणी झालेल्या सहकारी संस्था व इंडियन ट्रस्ट ॲक्ट 1882 अंतर्गत नोदणी झालेल्या ट्रस्ट (धर्मदाय संस्थांना) विविध कामे मिळून या योजनेअंतर्गत प्रत्येकी जास्तीत जास्त पंचवीस लाख रूपयांपर्यंत लाभ देणे अनुज्ञेय आहे.

**डोगरी क्षेत्र विकास कार्यक्रम**

नंदुरबार जिल्ह्यात नवापूर, अक्लकुवा व अक्राणी हे तीन पूर्ण डोगरी गट असून तळोदा व शहादा हे उप डोगरी गट आहेत. प्रत्येक पूर्ण डोगरी गटासाठी सन 2007-08 आर्थिक वर्षापर्यंत रूपये पन्नास लक्ष व उप डोगरी गटासाठी रूपये पंचवीस लक्ष निधी उपलब्ध होत होता, परंतु, सन 2008-09 या आर्थिक वर्षापासून प्रत्येक पूर्ण डोगरी गटासाठी रूपये साठ लक्ष व उप डोगरी गटासाठी रूपये तीस लक्ष निधी उपलब्ध होत आहे.

या कार्यक्रमांतर्गत रस्ते, शाळा खोल्यां/अंगणवाडी, एस.टी. पीकअपशेड, पाणी पुरवठ्याची कामे, समाजमंदीर, सामाजिक सभागृह, साठवण बंधारे , शाळेसाठी संगणक संच तसेच विद्युत विकासाची प्रत्येकी 10 लक्ष रूपये अंदाजित किंमतीची कामे हाती घेता येतात.